श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला साडेआठ कोटींचे उत्पन्न

आषाढी यात्रेत मुक्तहस्ते दान !

- भाविक संख्या - १५ लाख
- मुखदर्शन घेतलेल्यांची संख्या - १० लाख ८८ हजार
- गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढलेले उत्पन्न - २,०७,२९,९४७ रुपये
- एकूण उत्पन्न - ८,३४,९०,१७४ रुपये

लोकसत्ता वार्ताहर

पंढरपूर : आषाढी यात्रा काळात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या तिजोरीत तब्बल ८ कोटी ३४ लाख ९० हजार १७४ रुपयांचे दान जमा झाले आहे. यंदा १० लाख ८८ हजार भाविकांनी श्री विठ्ठल आणि रुक्मिणीमातेचे दर्शन घेतल्याची माहिती समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. आषाढी यात्रेला राज्यातून आणि कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश येथूनही मोठ्या संख्येने भाविक येतात. यंदा मृग नक्षत्रावर राज्यात अनेक ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची कामे पूर्ण करून पंढरीची वाट धरली. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर सहा ते २१ जुलै या काळात व्हीआयपी, ऑनलाइन दर्शन सेवा बंद ठेवण्यात आल्या होत्या. या काळात मंदिर समितीला विविध माध्यमांतून उत्पन्नवाढ झालेली दिसून आली.

मात्र, यंदा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे काम सुरू आहे. त्यामुळे देवाच्या नित्यपूजा, तुळशीपूजा बंद ठेवाव्या लागल्याने त्यातून येणारे उत्पन्न घटले. तुळशीपूजेसाठी २१०० रुपये, पाद्यपूजेसाठी ५००० रुपये आणि नित्यपूजेला विठ्ठलाकडे २५,०००, तर रुक्मिणी मातेकडे ११,००० रुपये शुल्क आकारले जाते. यंदा चांदीचे दान वाढल्याचेही निरीक्षण आहे.

> यंदा आषाढी यात्रेला भाविकांची संख्या जास्त होती. त्यामुळे मंदिर समितीला गेल्या वर्षीच्या तुलनेत दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळाले आहे. विविध सुविधा आणि सुलभ दर्शन देण्यावर मंदिर समितीचा भर आहे.
> – राजेंद्र शेळके, कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर

परळीत दोन गटांत वाद

जरांगेंवरील संदेश प्रसारित केल्याचा आरोप

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मनोज जरांगे पाटील यांच्यावरील संदेश समाजमाध्यमावर प्रसारित का करतो म्हणून मारहाण केल्याची व जिवे मारून टाकण्याची धमकी दिल्याच्या संदर्भातील तक्रारीवरून परळी पोलीस ठाण्यात रविवारी सायंकाळी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अजय शंकरराव देशमुख यांनी तक्रार दिली आहे. ज्ञानेश्वर मुंडे व ओंकार मुंडे असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

शंकर पार्वतीनगर येथील रहिवासी असलेले अजय देशमुख यांनी तक्रारीत म्हटले आहे, की जरांगे पाटील यांच्या नवसपूर्तीसाठी रविवारी परळी ते तुळजापूर अशी दिंडी निघाली होती. त्यात सहभागी होण्यासाठी जात असताना वैद्यनाथ कॉलेजनजीक तीन ते चार दुचाकींवर बसलेले तरुण आले. आपली दुचाकी अडवली. त्यातील ज्ञानेश्वर मुंडे याने, तू समाजमाध्यमावर जरांगे पाटलांविषयीचे संदेश का प्रसारित करतो म्हणत कंबरेच्या पट्ट्याने मारहाण केली.

ओंकार फड याने काठीने मारहाण केली. तसेच त्याच्या इतर सहकाऱ्यांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून, यापुढे जरांगे पाटलांचे संदेश प्रसारित केले, तर जिवे मारून टाकू, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, या घटनेनंतर वैद्यनाथ कॉलेज ते कन्हेरवाडीच्या मार्गावर दिंडीतील तरुणांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी काही वेळ ठिय्या मांडला होता.

MANAPPURAM HOME FINANCE LTD.

मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

पूर्वीची मणप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.

सीआयएन : यू६५९२३के१२०१०पीआयसी०३९१७९

युनिट नं. ३०१ ते ३१५, तिसरा मजला, "ए" विंग, "कनाकिया वॉल स्ट्रिट", अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पू), मुंबई-४०००९३.

संपर्क क्र. : ०२२-६८१९४०००/०२२-६६२११०००

मागणी सूचना

ज्याअर्थी, "मणप्पुरम होम फायनान्स लि."च्या प्राधिकृत अधिकारींनी, आमचे नोंदणीकृत कार्यालय येथे असलेले - IV/ ४७०ए (जुना) डब्लु/६३८ए (नवीन) मणप्पुरम हाऊस वलापाड थ्रिसूर, केरळ - ६८०५६७ आणि भारतातील विविध ठिकाणांकडील शाखा (यापुढे "एमएएचओएफआयएन" म्हणून संदर्भित) कंपन्या अधिनियम, १९५६ अंतर्गत एक नोंदणीकृत कंपनी आहे आणि निवासी युनिट्सची खरेदी आणि/ किंवा बांधकाम याकरिता अग्रीम कर्जाचा व्यवसाय करीत असलेली, इतर गोष्टींसमवेत, भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याद्वारे निर्गमित केलेल्या दिनांकित १८ डिसेंबर, २०१५ अधिसूचना क्र. एस.ओ. ३४६६ (ई) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे "ॲक्ट" म्हणून संदर्भित)च्या सेक्शन २ च्या सब-सेक्शन (१) क्लॉज (एम)च्या सब-क्लॉज (iv) च्या अर्थबोधासह एक वित्तीय संस्था आणि ज्याअर्थी "एमएएचओएफआयएन"कडून कर्ज प्राप्त केलेल्या याखाली नमूद केलेल्या तक्त्याच्या रकाना नं. २ मध्ये नमूद केल्यानुसार ऋणको/ सह-ऋणको आणि ज्याअर्थी "एमएएचओएफआयएन" सरफेसी ॲक्टअंतर्गत सुरक्षित धनको असलेली, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल २ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत, सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रकमेवरील पुढील व्याजासह सूचनांमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता, याखाली नमूद केल्यानुसार ऋणको/ सह-ऋणकोंवर फर्माविणारी मागणी सूचना निर्गमित केली होती, परंतु सूचना विविध कारणास्तव त्यांच्यापैकी काहीजणांना पोहोचू शकल्या नाहीत. असे की, याखाली नमूद केलेल्या उक्त ऋणकोंच्या माहिती हेतुप्रीत्यर्थ, त्यांना या जाहीर सूचनेमार्फत कळविण्यात येत आहे.

अनु. क्र.	ऋणको/ सह-ऋणकोचे नाव/ एलएएन/ शाखा	सुरक्षित मत्तेचे वर्णन, ज्याकरिता स्वारस्याची निर्मिती करण्यात आली आहे	एनपीए तारीख	सूचना पाठविल्याची तारीख व थकित रक्कम
१	सुषमा प्रताप शिंदे, प्रताप रावसाहेब शिंदे/ एमएचएल००६०००३११०/ नांदेड	जी पी एच नं. १७३, ॲट - दाताला, ता. कंधर, जि. नांदेड, जी पी ऑफिसजवळ, कंधर, पी.ओ. दहिकालंबा, नांदेड, महाराष्ट्र, पीन : ४१३७०७.	१६.०७.२०२४	१९.०७.२०२४ व रु. ४४९७४३/-

सूचना, त्यामुळे यावर नमूद केल्यानुसार, ऋणको/ सह-ऋणकोंना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, संबंधित ऋणको/ सह-ऋणकोंच्या अनुसार, यावर दर्शविल्यानुसार एकूण थकित रकमेचे प्रदान करण्यास त्यांच्यावर फर्माविणारी देण्यात आली आहे. जर संबंधित ऋणको/ सह-ऋणको पुढील व्याजासह एकूण थकित रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरल्यास, "एमएएचओएफआयएन"ला यावर वर्णिल्यानुसार मालमत्तेवरील सुरक्षा हिताच्या अंमलबजावणीस सेक्शन १३(४) अंतर्गत भाग पडणार आहे, तसेच ॲक्ट व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांतर्गत विहित केल्यानुसार अन्य प्रकारे सूचनेच्या सेवेकरिता पाऊले उचलण्यात येत आहेत. तुम्हास सूचना देण्यात येते की, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(८) मध्ये सविस्तररीत्या दिल्यानुसार, विक्रिद्वारे हस्तांतरणाकरिता खाजगी करार किंवा जाहीर लिलावाकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळेत "एमएएचओएफआयएन"द्वारा निघालेली किंमत, आकार व खर्च यासह एकत्रीत एकूण देय रकमेचे प्रदान करून उक्त गहाणवट मालमत्तेचे विमोचन करता येईल.

नोंद घ्यावी की, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३ (१३) च्या अनुसार, तुम्हास याद्वारा विक्री, भाडेपट्टा किंवा कोणत्याही अन्य तऱ्हेने सुरक्षित मत्तेशी व्यवहार करण्यास आणि / किंवा तिच्या हस्तांतरणास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

दिनांक : ३०.०७.२०२४ **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**

स्थळ : नांदेड **मणप्पुरम होम फायनान्स लि.**

ओबीसी आरक्षण यात्रा कोणाच्या विरोधात नाही

भूम येथील सभेत ॲड.आंबेडकरांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ओबीसी, एस.सी., एस. टी. आरक्षण बचाव यात्रा कोणाच्या विरोधात नाही, असे स्पष्ट करून वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची आरक्षणाची मागणी रास्त असली तरी ती मांडण्याची पद्धत चुकीची असल्याचे भूम येथे सांगितले.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली चैत्यभूमीपासून निघालेल्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे रविवारी दुपारी धाराशिव जिल्ह्यात आगमन झाले. दुपारी परंडा येथे सभा झाल्यानंतर सायंकाळी साडेसातच्या सुमारास यात्रेचे भूम येथे आगमन होताच जोरदार स्वागत करण्यात आले, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी ॲड. आंबेडकर म्हणाले, येथील १९६० सालापासून सत्तेत असलेला मराठा समाजाची श्रीमंती वाढत गेली आणि दुसरीकडे गरीब मराठ्यांची गरिबी वाढली. त्यामुळे सर्व गरीब मराठ्यांनी ओबीसींना दोष देऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रदेश अध्यक्ष रेखा ठाकूर, वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल, जिल्हाध्यक्ष बी. डी. शिंदे आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

पुणे, परभणीत चोरलेल्या १३ दुचाकी जप्त, चौघे अटकेत

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : जिल्ह्यासह परभणी, यवतमाळ, पुणे जिल्ह्यांत दुचाकी चोरणाऱ्या चार चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले असून त्यांच्याकडून १३ दुचाकी जप्त केल्या आहेत. दुचाकी चोरीचे नऊ गुन्हे उघडीस आणण्यात हिंगोली पोलिसांना यश आले आहे.

जिल्ह्यात दुचाकी चोरीला जाण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत होते. याची दखल घेऊन दुचाकी चोरट्यांचा शोध घेण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक जी. श्रीधर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. सहायक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे, पोलीस उपनिरीक्षक कपील आगलावे यांचे पथक चोरट्यांच्या मागावर होते. हिंगोली, परभणी, यवतमाळ, पुणे जिल्ह्यात दुचाकी चोरणारे चोरटे हे हिंगोली जिल्ह्यात आल्याची माहिती २७ जुलैला पथकाला माहिती मिळाली. पथकाने आकाश गजानन उचितकर, नरेश गजानन रसाळ (दोघे, रा. माळहिवरा, ता. हिंगोली), आदर्श जीवन कांबळे (रा. तोंडगाव, ता. वाशिम) यांना रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता तीन दुचाकी चोरल्याची कबुली त्यांनी दिली.

त्या दुचाकी जप्त करण्यात आल्या. दरम्यान, दुसऱ्या पथकाने लक्ष्मण पांडुरंग ढोबळे (रा. गुंडा, ता. वसमत, ह.मु. एमआयडीसी परभणी) यास ताब्यात घेतले. त्याला विचारपूस केली असता त्याने परभणी शहरातील नवामोंढा हद्दीतून दहा दुचाकी चोरल्याची कबुली दिली.

'साई'चे संजय मुळे सन्मानित

छत्रपती संभाजीनगर : येथील साई एंटरप्रायझेसचे मालक संजय मधुकर मुळे यांना त्यांच्या उद्योग क्षेत्रातील कार्यासाठी 'महाराष्ट्र भूषण जीवन गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले. राजस्थानातील जयपूर येथे प्रसिद्ध अभिनेत्री ईशा देओल यांच्या हस्ते मुळे यांनी 'एक्सलंसी आयकॉनिक ॲवॉर्ड' समारंभात पुरस्कार स्वीकारला. प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कॉर्पोरेट अफेअर मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या श्री फिंगर्स इंटरटेनमेंट लि. च्या वतीने 'फाव फेअर्स या इव्हेंट मॅनेजमेंट' कंपनीच्या माध्यमातून दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. विविध उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा गौरव करण्यात येतो.

'बहिष्कृत हितकारिणी'चा ४ रोजी शतक सोहळा

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा २० जुलै १९२४ या दिवशी स्थापन करून सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जीवनाला सुरुवात केली. या घटनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याचे औचित्य साधून झेप साहित्य चळवळीकडून रविवारी (दि. ४) डॉ. हृषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत हितकारिणी सभा शतक महोत्सवी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या सभागृहात दुपारी १२ वाजता या सोहळ्याचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेशाध्यक्ष दिनेश हनुमंते हे करणार आहेत. स. सो. खंडाळकर, डॉ. बी. जी. गायकवाड, प्रा. शिवाजी वाठोरे, ॲड. विजयकुमार कस्तुरे, डॉ. राजेंद्र शेजूळ, श्रीमती ए .बी. साळवे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती झेप साहित्य चळवळीचे संस्थापक डी. एन. जाधव यांनी दिली.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रा विशेष

यात्रासहल

दोस्तीटूर *शास्त्रोक्त नर्मदापरिक्रमा *कुरवपुरम-पिठापुरम *त्रिस्थळी-अयोध्या- नैमिष्यआरण्य *केरळ-तमिळनाडू *चारधामयात्रा *भुतान *आसाम- पूर्वांचल *नेपाळ *कोस्टल कर्नाटका *श्रीलंका. 9594880123/ 9702251584

0070915287-1

स्थावर मालमत्ता?

तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

ताबा सूचना (नियम - ८ (१))

ॲसेटस् रिकव्हरी शाखा - छत्रपती संभाजीनगर : प्लॉट नं. ०३, पहिला मजला, सहकार बँक कॉलनी, शाहनूरवाडी, दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.

ज्याअर्थी, खालील सही करणार युनियन बँक अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शील ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२, नियम ८चे कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार कर्जदार/जामिनदार/गहाणदार **मे. वत्सला इलेक्ट्रीकल्स, संदीप प्रभाकर फिसके (भागीदार), संजय तेजमल बोरा (भागीदार), शेख सत्तार साहेबलाल (भागीदार), भाऊसाहेब लिंबराज गणगणे (जामिनदार), सुरेखा दत्तात्रय काळे (जामिनदार), राजेंद्र नेमीचंद सुराणा (जामिनदार), संगीता राजेंद्र सुराणा (जामिनदार), आरेफा प्रवीण सत्तार शेख (जामिनदार), मे. पटवारी इलेक्ट्रीकल्स, प्रोप्रा. संजय दिनकर पटवारी (जामिनदार) व मे. लातूर डेव्हलपर (जामिनदार), भागीदार शेख अन्सारी अहमद मोहम्मद, शेख मोइजुद्दीन नईमोद्दीन, संजय तेजमल बोरा, सलीम रौलसाहेब मणियार** यांना दि. ०७/०९/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवली होती की, त्यांनी नोटीसमध्ये उल्लेख केलेली देय रक्कम **रु. २२,०७,०८,७७७.९८ (रुपये बावीस कोटी सात लाख आठ हजार सातशे सत्त्याहत्तर आणि अठ्ठाणण्व पैसे मात्र)** व त्यावरील करारात नमूद दराने **दि. ०७/०९/२०२१** पासून व्याज ही एकत्रित रक्कम सदर नोटीस प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत भरावी.

कर्जदार/जामिनदार/तारणदार /यांनी सदर रक्कम न भरल्याने याद्वारे कर्जदार तसेच तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी नियम ८चे कलम १३ (४) अन्वये प्राप्त अधिकारानुसार परिशिष्टात नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. २५/०७/२०२४** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदार/जामीनदार/तारणदार, तसेच तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणीही कसल्याही प्रकारे व्यवहार करू नये, याउपर कोणीही सदर मिळकतीबाबत व्यवहार केल्यास तो युनियन बँक ऑफ इंडियाचा बोजा रक्कम **रु. २२,०७,०८,७७७.९८ (रुपये बावीस कोटी सात लाख आठ हजार सातशे सत्त्याहत्तर आणि अठ्ठाणण्व पैसे मात्र)** व त्यावरील करारात नमूद दराने व्याजासह असेल. कायद्याच्या कलम १३च्या उपकलम (८)च्या तरतुदींकडे स्थावर मालमत्तेच्या पूर्तता करण्यासाठी कर्जदाराचे उपलब्ध वेळेसंदर्भात लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन :- श्रीमती आरेफा प्रवीण सत्तार शेख (जामिनदार/कर्जदार) यांच्या मालकीची मिळकत - निवासी प्लॉट - प्लॉट नं. ४, एम.एच. नं. आर-३/२१६/९-सी, पैकी सिटीएस नं. १०७०९, मोजमाप ३७१.७४ स्के.मी., मेहबूब नगर, लातूर येथे स्थित.

पुढीलप्रमाणे **चतु:सीमा: पूर्व** : २० फूट रूंद रस्ता, **दक्षिण** : १२.९ मीटर रुंद रस्ता, **पश्चिम** : प्लॉट नं. ५ व ६, **उत्तर** : प्लॉट नं. ३-सी.

दिनांक : २५/०७/२०२४ (मराठी भाषांतर मूळ इंग्रजी मसुदा ग्राह्य) **शिक्का** **अधिकृत अधिकारी**

ठिकाण : छ. संभाजीनगर **युनियन बँक ऑफ इंडिया**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

नोंदणीकृत कार्यालय : ग्रेप गार्डन, क्र. २७, ३रा 'ए' क्रॉस, १८वा मेन, ६वा ब्लॉक, कोरामंगलम, बेंगळूरु-५६० ०९५, कर्नाटक.

क्षेत्रीय कार्यालय : ७वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्व्हे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे-४११ ०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमावली, २००२च्या नियम ८(६) आणि ९सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदाच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव ''जे आहे जसे आहे तत्त्वावर'' आणि ''जसे आहे तसे आहे तत्त्वावर'' खाली विहित करण्यात आलेल्या दिनांकाला केला जाईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३(२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु.मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आयएनआरमध्ये/ इरठे आयएनआरमध्ये
१.	४४७४२१००४००००००१/ ४४७४-जळगाव	**१) गोविंदा चिंधू कोळी, २) चिंधू कान्हा कोळी, ३) निर्मला चिंधू कोळी** सर्व येथे राहणार- घर क्र. ४०११, अमोडे खुर्द येथे, किनोड, तालुका आणि जिल्हा जळगाव-४२५ ००२.	०८.०९.२०२१ / ११.०८.२०२१ अनुसार रु. ७,१६,३६१/-	२४.०५.२०२३	रु. ६,२३,०००/- / रु. ६२,३००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव अमोडे, तालुका आणि जिल्हा जळगाव, येथे वसलेल्या ५५.७४ चौ.मी. मोजमाप असलेल्या जीपीएच क्र. ४०/१चा सर्व खंड आणि भूखंड.				

मालमत्ता (मत्ता)च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ	:	**०२.०८.२०२४ आणि ०९.०८.२०२४ रोजी स. ११.०० वा. ते सायं. ०४.०० वा.पर्यंत**
बोली आणि इरठे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ	:	**१९.०८.२०२४ रोजी स. ११.०० वा. ते सायं. ०५.०० वा.दरम्यान**
लिलावाचा दिनांक आणि वेळ	:	**२०.०८.२०२४ रोजी स. ११.०० वा. ते दु. ०२.०० वा.**

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआरमध्ये (''उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.''च्या नावे डिमाण्ड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे)

बोली सादर करण्याचे ठिकाण : १) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रिंग रोड, जळगाव, जळगाव-४२५ ००१.

(संपर्क व्यक्ती : अर्जुन शेरकर - ८४२१४१७०४१, शिवाजी खाडे - ७०५८०८०९१५)

अटी व शर्ती : ई-लिलाव ''जेथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जे काही आहे ते'' आधारावर आयोजित केले जात आहे.

१. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि माहितीनुसार, कोणत्याही मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचा बोजा, मालमत्तेचे शीर्षक/ लिलावात ठेवलेले दावे/ हक्क/ देय/ दावे यासंबंधी स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात कोणत्याही वचनबद्धतेची किंवा बँकेच्या कोणत्याही प्रतिनिधित्वाची स्थापना करीत नाही आणि मानली जाणार नाही. बँकेला ज्ञात असो वा अज्ञात असो, सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/ सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/ अधिकार/ देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२. बोली सबमिट करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशिलाची तपासणी करणे आणि त्यांचे समाधान करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणी प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनानुसार नमूद केल्याप्रमाणे साइटवर इच्छुक बोलीदारांना परवानगी दिली जाईल.

३. इच्छुक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरीलप्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.

४. ई-लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : एम. प्रभाकरन (मो. क्र. ७४१८२८१७०९) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदारांना ई-लिलावासंदर्भात ऑनलाइन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाइन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६; ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.

५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल, मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकारांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली/ निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना आहे.

६. यशस्वी बोलीदारांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदारांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्री किमतीच्या २५% रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसांत किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदारांनी वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार रक्कम अदा केली नाही तर याआधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदारांना मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.

७. ही सूचना महत्त्वाच्या मुद्द्यांना अनुसरून आहे.

८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज/ खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी, ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विनाअडथळा सहभाग घेऊ शकतील.

ही सूचना वरीलप्रमाणे नमूद केलेले कर्जदार/ हमीदार/ तारणदार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाण : जळगाव सही/- प्राधिकृत अधिकारी

दिनांक : ३०.०७.२०२४ उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑपरेटीव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी) (नियम ८(१) तहत)

क्षेत्रिय कार्यालय, औरंगाबाद

सिटी चौक, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) - ४३१००१

ज्या अर्थी खालील सही करणार **बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑपरेटीव्ह बँक लि. चे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ चे नियम ९ सह वाचले जाणारे कायद्याचे कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील कर्जदार, गहाणदार व जामीनदार यांना खालील तक